आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता

२६ मे २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात मोसमी पावसानं पदार्पणातच मोडला १०७ वर्षांचा विक्रम

- मुंबईसह कोकणात सर्वत्र मुसळधार पाऊस, प्रशासनाला सज्ज राहण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या सूचना

- देशाच्या विकासासाठी आवश्यक प्रत्येक गोष्ट देशातच तयार व्हावी ही काळाची गरज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाच्या माध्यमातून विभागातल्या प्रत्येक गावात येत्या पाच वर्षात पाणी पोहोचेल अशी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची ग्वाही

**आणि**

- भाजपाचे माजी आमदार आर टी देशमुख यांचं अपघाती निधन

**<><><><><>**

राज्यात सर्वत्र जोरदार पाऊस होत असून नैऋत्य मोसमी पावसानं १०७ वर्षांचा विक्रम मोडत राज्यात वेळेआधीच प्रवेश केला आहे. पुणे, सातारा, सोलापूर, रायगड, मुंबई आणि उपनगर भागात अतिवृष्टी झाली आहे. राज्यात येत्या २ दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र, आणि मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी तर विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**मुंबईत** २४ तासात सुमारे १३५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. मुसळधार पावसानं शहरातलं जनजीवन विस्कळीत झालं आहे. सखल भागांत, तसंच रेल्वेरुळांवर पाणी भरलं आहे. विमानांची उड्डाणंही उशिरानं सुरू आहेत.

शहरातल्या ९६ धोकादायक इमारतींमधल्या तीन हजारापेक्षा जास्त लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे.

याबाबत अधिक माहिती ऐकूया आमचे प्रतिनिधी विष्णू सोनवणे यांच्याकडून -

**होल्ड - बाईट - सोनवणे (३३ सेकंद)**

हवामान विभागानं आज मुंबईसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. पुढच्या २४ तासांत जोरदार पावसाची शक्यता असून नागरिकांना सतर्क राहण्याची सूचना देण्यात आली आहे.

**रायगडमध्ये** वीज पडून एकाचा मृत्यू झाला आहे. अतिवृष्टीमुळे महाड ते रायगड किल्ला रस्ता बंद करण्यात आला आहे.

**रत्नागिरीच्या** खेड तालुक्यात जगबुडी नदीची पाणीपातळी वाढली असून, खेड ते दापोली रस्ता फुरुसजवळ बंद असून, वाहतूक पालगडमार्गे वळवण्यात आली आहे.

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात** एकूण ५९ गावांना अतिवृष्टीचा फटका बसला असून अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात अंदाजे २१ लाख रुपयांचं नुकसान झालं आहे.

**पुणे जिल्ह्यात** दौंडमध्ये ११७ मिलिमीटर, बारामतीत १०५ मिलीमीटर, इंदापुरात ६३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. बारामतीत पुरात अडकलेल्या सात जणांना वाचवण्यात यश आलं असून ७० ते ८० कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. इंदापूरमध्येही पुरात अडकलेल्या २ जणांना वाचवण्यात आलं आहे.

**सातारा जिल्ह्यात** फलटणमध्ये १६३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. दुधेबावी गावाजवळ अडकलेल्या ३० नागरिकांना एनडीआरएफच्या पथकानं वाचवलं आहे.

**सोलापूर जिल्ह्यात** ६८ मिलिमीटर पाऊस झाला. माळशिरस तालुक्यात पुरात अडकलेल्या ६ जणांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आलं आहे. पंढरपूर इथं भीमा नदी पात्रात अडकलेल्या ३ जणांचं बचावकार्य सुरू आहे. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूरच्या घाट परिसरात पावसाचा जोर आणखी काही दिवस कायम राहणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित जिल्हा यंत्रणांनी सतर्क राहून उपाययोजना कराण्याच्या सूचना प्रशासनानं केल्या आहेत.

**सांगली** जिल्ह्यात पावसामुळे कृष्णा नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली असून बहे, डिग्रज, सांगली आणि म्हैशाळ बंधारे पाण्याखाली गेले आहेत.

राज्यातल्या पावसाच्या स्थितीचा **मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांनी आज आढावा घेतला. त्यांनी संपूर्ण प्रशासनाला अलर्ट राहण्याच्या सूचना त्यांनी आहेत. नुकसानग्रस्त भागात तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

बारामतीमध्ये गेल्या दोन दिवसात झालेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर **उपमुख्यमंत्री** अजित पवार यांनी आज निंबोडी, शेटफळगढे, मदनवाडी आणि भिगवण इथल्या नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली.

**<><><><><>**

मुंबई आणि परिसरात पावसामुळे बाधित झालेल्यांच्या मदतीसाठी सर्व यंत्रणा सुसज्ज असल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातल्या पाऊस बाधित क्षेत्राची पाहणी केल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

मुंबईत सध्या नालेसफाई सुरू असून ती लवकरच पूर्ण होईल. यापूर्वी मान्सूनपूर्व तयारीसाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पालिका प्रशासन, आपत्ती व्यवस्थापनाची बैठक घेण्यात आली होती. त्यांचे सर्व विभागांशी समन्वय साधला जात असल्याचं ते यावेळी म्हणाले. मुंबईत काही ठिकाणी दरड

कोसळण्यासंदर्भातही आपण सेफ्टी नेट बांधण्याचे आदेश आयुक्तांना दिल्याचंही शिंदे म्हणाले.

मुंबईत सुरू असलेल्या पावसामुळे नागरिकांनी गरज असेल तरच घराबाहेर पडावं. तसंच समुद्रकिनारी आणि सखल भागात जाणं टाळावं, असं आवाहन प्रशासनान केलं आहे.

**<><><><><>**

मंत्रालयाच्या इमारतीपर्यंत पाणी पोहोचणं हे सरकारच्या उदासीनतेचं लक्षण असल्याची टीका काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केली आहे. कोट्यवधी रुपये खर्च करूनही सरकार मुंबईतली ड्रेनेज सिस्टीम नीट करू शकत नाही, केवळ एका पावसात मुंबईत पाणी साचतं, हा सरकारचा बेशिस्त कारभार आहे, असं पटोले म्हणाले. पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचं नुकसान झालं आहे, मात्र नुकसानभरपाई दिली गेली नाही. सरकार शेतकऱ्यांकडे पाठ फिरवत आहे, असं पटोले म्हणाले.

**<><><><><>**

देशाच्या विकासासाठी आवश्यक सर्व गोष्टी देशातच तयार व्हाव्यात, ही काळाची गरज असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मोदी यांनी २०१४ मध्ये भारताचे प्रधानमंत्री म्हणून शपथ घेतल्याला आज ११ वर्षे पूर्ण झाली, त्यानिमित्त गुजरातमधे दाहोद इथं झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी रेल्वे इंजिन प्रकल्पासह, सुमारे २४ हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचं उद्घाटन, पायाभरणी आणि लोकार्पण मोदी यांच्या हस्ते झालं.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी या प्रकल्पातच तयार झालेल्या पहिल्या इलेक्ट्रिक रेल्वे इंजिनाला तसंच वलसाड - दाहोद एक्सप्रेस रेल्वे गाडीलाही हिरवा झेंडा दाखवला. यानंतर आज संध्याकाळी भूज इथं त्यांनी ५० हजार कोटींपेक्षा जास्त रकमेच्या विकास प्रकल्पांचं उद्घाटन, भूमीपूजन आणि लोकार्पण केलं. या प्रकल्पांमुळे भारताला नील अर्थव्यवस्था आणि हरित उर्जेचं जागतिक केंद्र होण्यात

मदत होईल, असं त्यांनी सांगितलं. येत्या काळात हरित उर्जा महत्वाची ठरणार आहे, त्या अनुषंगानंच आज पायाभरणी केलेल्या हरित हायड्रोजन कारखान्यामुळे कच्छ हे हरित उर्जेचं जगातलं सर्वात मोठं केंद्र म्हणून उदायाला येईल, असं ते म्हणाले. जगातल्या सर्वात मोठ्या सौर ऊर्जा केंद्रांपैकी एक केंद्र कच्छमध्ये उभारलं जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

दहशतवादाविरुद्ध सरकारचं धोरण शून्य-सहिष्णुतेचं असून ऑपरेशन सिंदूरनं सरकारचं धोरण स्पष्ट केलं आहे असं ते म्हणाले. ऑपरेशन सिंदूर ही मानवतेला वाचवण्याची आणि दहशतवाद संपवण्याची मोहिम असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाच्या माध्यमातून विभागातल्या प्रत्येक गावात येत्या पाच वर्षात पाणी पोहोचेल, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. नांदेड इथं आज हरित क्रांतीचे जनक तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा आणि परिसर सुशोभिकरण कामाचं लोकार्पण शहा यांच्या हस्ते झालं. त्यानंतर झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. कोकण आणि कृष्णा खोऱ्यातलं वाहून जाणारं पाणी मराठवाड्यासाठी वळवण्याचं नियोजन करण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार अशोक चव्हाण, खासदार अजित गोपछडे, मंत्री पंकजा मुंडे, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

त्याआधी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते नागपूरजवळ जामठा इथल्या राष्ट्रीय कर्करोग संस्थेत स्वस्ती निवासचं भूमिपूजन तसंच कामठी इथं राष्ट्रीय न्यायवैद्यक विद्यापीठाची पायाभरणी झाली. राष्ट्रीय कर्करोग संस्था ही आगामी काळात देशातल्या प्रमुख कॅन्सर इन्स्टिट्यूटपैकी एक असेल असा विश्वास

शहा यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय न्यायवैद्यकशास्त्र विद्यापीठाच्या नागपूर परिसराची पायाभरणीही शाह यांनी केली.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या माजलगाव मतदारसंघाचे भाजपाचे माजी आमदार आर टी देशमुख यांचं अंबाजोगाई-लातूर महामार्गावर झालेल्या अपघातात निधन झालं. औसा इथून माजलगावला परत येत असताना त्यांच्या कारला भीषण अपघात झाला. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे जून-जुलै २०२५ मध्ये घेतल्या जाणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षेचं वेळापत्रक जाहीर झालं आहे. इयत्ता बारावीची लेखी परीक्षा २४ जून ते १६ जुलै तर दहावीची परीक्षा २४ जून ते ८ जुलै या कालावधीत होणार आहे.

**<><><><><>**

जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरणाच्या छत्तीसाव्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईत आज प्राधिकरणावरच्या एका कॉफी टेबल बुकचं अनावरण  केंद्रीय बंदरे, जहाज आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या हस्ते झालं.  भारत हा जगातील पाच महत्वाच्या सागरी देशांपैकी एक आहे असं सांगत वाढवण बंदर हे त्या दृष्टीने महत्वाचं असल्य़ाचं सोनोवाल म्हणाले.

**//<><><><><>//**